| MHRG130000532024 | **फौजदारी चौकशी अर्ज क्र.०२/२०२४**<br>**सौ. अश्विनी मंडपे**<br>**विरुध्द**<br>**राकेश वगैरे ३** |
| --- | --- |

## निशाणी क्र.४ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ मधील तरतुदीनुसार कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे :-**

०२. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक १७/०५/२०१७ रोजी हिंदु धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे मौजे गिम्हवणे, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार या सामनेवाला क्र.१ सोबत त्यांच्या गावी मुंबई येथे नांदायला गेल्या.

०३. अर्जदारच्या कथनानुसार लग्नानंतर अंदाजे दोन महिने अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी संसार सुखसमाधानाने केला. त्यानंतर सामनेवाला यांनी त्यांचे रंग दाखवण्यास सुरुवात केली होती. सामनेवाला क्र.१ यास सामनेवाला क्र.२ ते ४ यांची वागण्यास फूस होती. त्यामुळे सामनेवाला हे अर्जदारवर संशय घेवून मारझोड करत असत. विवाहाच्या वेळी अर्जदारच्या माहेरील मंडळीने संसार उपयोगी वस्तू दिल्या होत्या तरी देखील सामनेवाला क्र.२ व ३ हे अर्जदारास काहीना काही कारणावरुन टोमणे मारत होते. तसेच अर्जदाराने माहेरकडील मंडळीकडून वस्तू आणाव्यात अशी सामनेवाला क्र.१ ते ३ यांची अपेक्षा होती. अर्जदारने सदर गोष्टीला विरोध केल्यावर सामनेवाला यांनी अर्जदाराचा अनेकवेळा मानसिक व शारिरीक व छळ करुन त्रास दिला. सामनेवाला क्र.२ ते ४ हे

सामनेवाला क्र.१ ला अर्जदाराच्या विरोधात भडकावत असत. त्यावरुन सामनेवाला क्र.१ ने अर्जदारला अनेकदा मारझोड करुन अर्जदारास तिच्या आई–बहिणीवरुन शिवीगाळ करीत असे.

०४. अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, सामनेवाला क्र.२ व ३ या अर्जदार हिस जाणूनबुजून घरात जड कामे करायला सांगत असत. अर्जदाराची तब्येत बिघडल्यावर अर्जदार हिस डॉक्टरकडे न नेता "तु तुझ्या माहेरी जा आणि उपचार करत" असे सामनेवाला हे बजावत असत. सदरची बाब अर्जदार ही सामनेवाला क्र.१ यास वेळोवेळी सांगण्याचा प्रयत्न करीत असे परंतू सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिची बाजू ऐकून न घेता सामनेवाला क्र.२ ते ४ ची बाजू घेत असे. विवाहानंतर २ महिन्यानेच सामनेवाला क्र.१ ने अर्जदाराचा मोबाईल काढून घेतला व अर्जदारास मोबाईल फोन बाळगण्यास मज्ञाव केला. अर्जदार हिने माहेरील मंडळींशी संपर्क केला असता तिला वेळोवेळी मारझोड व शिवीगाळ देखील केली. सरतेशेवटी अर्जदार हिने ऐकटवून माहेरील मंडळींना घडत असलेल्या प्रकाराची कल्पना दिली. त्यांनी अर्जदार सुखा समाधानाने नांदवावी या करिता अर्जदाराच्या वडीलांनी, घरातील ज्येष्ठ मंडळी व समाजातील नात्यातील मंडळींनी अर्जदाराच्या सासरच्या मंडळीशी संपर्क साधून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला परंतु, सामेनवाला हे कोणाचेही ऐकण्यास तयार नव्हते व सामंजस्याची बोलणी करण्यासाठी गेलेल्या अर्जदाराच्या नातेवाईकांना सामनेवाला यांनी घरातून हाकलून दिले. सामनेवाला यांनी दि.०२/११/२०२३ रोजी अर्जदारास घरातून बाहेर काढले. तेव्हापासून आजतागायत अर्जदार ही तिच्या वृध्द आईवडीलांसोबत माहेरी राहत आहे. अर्जदार ही कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय करीत नसल्याने तिला तिचा दैनंदिन खर्च भावण्यासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून राहवे लागत आहे. अर्जदाराच्या वडीलांची आर्थिक परिस्थिती देखील हालाखीची आहे. तसेच अर्जदाराच्या विवाहाकरिता खर्च झाल्याकारणाने व सासरच्या मागण्या पुर्ण

करण्याकरिता अर्जदाराच्या वडीलांना मोठ्या प्रमाणात कर्ज काढावे लागले आहे. त्यामुळे अर्जदारचे दैनंदिन जीवन जगणे कष्टप्राय होत आहे.

०५. सामनेवाला क्र.२ व ३ हे सामनेवाला क्र.१ चे आई–वडील असुन सामनेवाला क्र.२ हे नोकरी करीत आहे. सामनेवाला क्र.४ हे सामनेवाला क्र.१ चा भाऊ असून तो देखील नोकरी करीत आहे. त्यामुळे त्यांना अर्जदार क.१ अवलंबून राहावे लागत नाही. सामनेवाला क्र.१ हा नोकरी करत असून त्यांना दरमहा रुपये २५,०००/– पगार आहे. तसेच सामनेवाला क्र.१ यांच्या नावावर सायन येथे एक रुम आहे. सामनेवाला क्र.२ यांच्या नावावर ३ रुम व १ दुकान आहे. तसेच मौजे गिम्हवणे, येथे मोठे घर आहे. सामनेवाला क्र.१ त्यांच्यावर कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदारास स्वतःचे पालनपोषण करण्याकरिता उत्पन्न नाही. सबब, सामनेवाला क्र.१ ने अर्जदारास दरमहा १०,०००/– इतकी पोटगी देण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे.

**सामनेवालांचे म्हणणे थोडक्यात पुढील प्रमाणे :–**

०६. सामनेवाला यांनी निशाणी १३ येथे म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला यांच्या कथनानुसार त्यांनी सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचा विवाह झाला या बाबी मान्य करुन इतर सर्व बाबी नाकारल्या आहेत. सामनेवाला यांच्या कथनानुसार अर्जदार ला छानछोक राहणे पसंत असल्याने तिला सामनेवाला यांचेकडे एकत्रित कुटुंबात राहणे पसंत नव्हते. सामनेवाला हे केवळ मुंबईत राहणारा मुलगा आहे एवढे पाहुन अर्जदार हिने विवाह केला होता. अर्जदारने तिचा पतीची मालमत्ता व तो काय कमवतो याचा विचार केला नाही त्यामुळे विवाह करुन आल्यावर तिला आपला नवरा तुटपुंजा पैसा कमावत आहे याची माहिती झाल्यावर अर्जदारने घरात छळजाच व वेडेवाकडे वागणे सुरु केले. जेवणात मिठ जास्त घालणे, झोपलेल्या व्यक्तीवर पाणी टाकणे, नवऱ्याला लादी पुसायला लावणे, तिला मुल होण्याची ट्रिटमेंट चालू होती त्या दरम्यान आजारपणाचा बाउ करुन

झोपून राहणे. अर्जदार सांगते त्याप्रमाणे तिला केव्हाही मारझोड झालेली नाही. उलट सामनेवाला यांचे हसते खेळते कुटुंब हे अर्जदाराच्या वागण्याने उध्वस्त झाले आहे. अर्जदार ही मुंबई येथे घरकाम करीत असून दरमहा रु.१५,०००/– कमावते. तिचे शिक्षण इयत्ता १५ वी पर्यंत झाले आहे. अर्जदाराच्या माहेरी शेतीबाडी भरपूर आहे. त्यामुळे ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्जदारास अंतरिम पोटगीची आवश्यकता नाही. सामनेवाला क्र.१ हा साधा कामगार असून त्यास रुपये ७,०००/– दरमहा पगार आहे. त्यावर आईवडीलांची जबाबदारी आहे. तो वेगळा राहू शकत नाही. तो अर्जदाराला नांदवण्यास तयार आहे त्यामुळे त्याने अर्जदाराचा अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

०७. अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. अतुल चौगुले व सामनेवांला तर्फे विद्वान वकील श्रीम. अंकिता डवरुंग यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सामनेवाले यांनी केलेल्या कौटुंबिक हिंसाचारांच्या घटनांचे विस्तृतपणे वर्णन केलेले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाले तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारझोड करतात, तसेच टोमणे मारतात, तसेच माहेरुन वस्तू आणाव्यात अशी त्यांची अपेक्षा करतात असे कथन केले आहे. सामनेवाला यांनी वेगवेगळया कारणांवरुन अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे असे अर्जदाराच्या अर्जातील कथनांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

०८. अर्जदाराने असे कथन केले आहे की, दि.०२/११/२०२३ रोजी सामनेवाले यांनी तिला घरातून बाहेर काढून दिले आहे व त्यानंतर तिला नांदवण्यास नकार दिला. त्यामुळे तिला तिचे माहेरी राहावे लागत आहे. सामनेवाले यांनी तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. यावरुन असे दिसुन येते

की, सामनेवाला यांचे सदरचे कृत्य हे अर्जदाराची आर्थिक पिळवणुक करणे यामध्ये मोडते व ते कौटुंबिक हिंसाचार याच्या संज्ञेत समाविष्ट आहे. त्यामुळे याही कारणास्तव सामनेवाला यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

०९. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिचा पती आहे. त्यामुळे पती या नात्याने अर्जदार/पत्नीचे संगोपन करणे हे सामनेवाला क्र.१ चे कायदेशीर व नैतिक दायित्व आहे. परंतु, सामनेवाला याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नसल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असे अर्जातील कथनांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येते. याउलट अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला क्र.१ हा नोकरी करत असून त्याला दरमहा रुपये २५,०००/– इतका पगार आहे. परंतु, सामनेवाला क्र.१ याने सदरची बाब नाकारली असून त्याला केवळ रुपये ७,०००/– दरमहा उत्पन्न मिळते असे त्याने कथन केले आहे. सामनेवाला क्र.१ याने त्याच्या उत्पन्नाबाबत व दायित्वाबाबत कोणतेही शपथपत्र दाखल केलेले नाही. त्याचा पगाराचा दाखला दाखल केलेला नाही. परंतु, वरील कथनांवरुन असे प्रथमदर्शनी दिसुन येते की, सामनेवाला क्र.१ यास निश्चीतच उत्पन्नाचे साधन आहे व तो अर्जदारास अंतरिम पोटगी देण्यास पात्र आहे.

१०. मा. सर्वोच्च न्यायालयाने **राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल** या खटल्यामध्ये अंतरिम व कायमची पोटगी रक्कम ठरविताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांनुसार पोटगीची रक्कम निर्धारित करताना न्यायालयाने पत्नी व मुलांच्या आवश्यकतेनुसार उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, अर्जदाराचे स्वतःचे उत्पन्न व

सामनेवाला यांचे स्वतःचे उत्पन्न या गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते असे नमुद केलेले आहे. सामनेवाला तर्फे वकिलांनी असे कथन केले की सामनेवालाची परिस्थिती पाहता त्याच्यावर त्याच्या आईवडीलांची देखील जबाबदारी आहे. त्यामुळे सदर गोष्टींचा विचार अंतरिम पोटगी मंजूर करताना व्हावा. सबब, उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, उभय पक्षकारांचे उत्पन्नाचे साधन इत्यादी बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. सद्य परिस्थितीत जिवनावश्यक वस्तू जसे की, अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा यांची वाढती महागाई पाहता सर्वसाधारण माणसाला कमीत कमी दरमहा २ ते ५ हजार रुपये खर्च करावे लागतात. प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न, त्याच्यावर असलेली आईवडीलांची जबाबदारी तसेच अर्जदारास जीवन जगण्यासाठी जिवनावश्यक वस्तूंवर करावा लागणारा खर्च इत्यादी बाबींचा विचार करता सामनेवाला क्र.१ ने अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये ३,०००/– पोटगी देणे न्यायोचित होईल.

११. मा. सर्वोच्च न्यायालयाने **<u>राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल</u>** या खटल्याकामी असे निर्देश दिले आहेत की, अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्जदाराला अर्ज दिलेल्या तारखेपासुन द्यावी. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्ज दाखल दि.०५/०२/२०२४ पासून मिळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रुपये ३,०००/– (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) ही अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत किंवा या न्यायालयाच्या पुढील आदेश होईपर्यंत द्यावी. सदरची

पोटगीची रक्कम ही अर्ज दाखल दि.०५/०२/२०२४ पासून अर्जदारास द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2024.11.08 18:26:25 +0530

श्रीवर्धन (**ए. एस. साटोटे**)
दिनांक – ०८/११/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, श्रीवर्धन